# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०५/११/२०१८ चे गुन्हे आढावा.

| अ. क्र | पोलीस ठाणे | गु र नं कलम | गु घ ता वेळ ठिकाण | गु दा ता वेळ | फिर्यादी | आरोपी | अटक ता. वेळ | गेलेला माल | मिळालेला माल | घ.भेटी चा दि. व अधि | तपास | खुलासा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एम. वाळुज | 507/18 कलम 307, 504, 506,34 भादवी | 02/11/18 रोजी दुपारी 03.00 ते 04.00 वाजेच्या सुमारास झांबड चौक एम.आय.डी .सी वाळुज, औरंगाबाद | 04/11/18 रोजी 17.56 वाजता | आकाश एकनाथ वाकडे वय-20 वर्षे धंदा-मजुरी रा.बोध्दविहार साजापुर ता.जि. औरंगाबाद | अज्ञात | | | | | पोउप नि/ रोडे मो.94 2067 9513 | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्यांचे दोन मित्र 1) धमपाल पगारे व 2) किशोर बनसोडे असे त्याचे मोटार सायकलवर रांजणगावहुन साजापुर कडे जात असतांना रांजणगाव फाटा येथे एक काळया रंगाची स्लपेंडर मोटार सायकलवर दोन अनोळखी इसम आले व तुम्हाला गाडी निट चालविता येत नाही का तुम्ही कट का मारला असे म्हणुन शिवीगाळ केली व फिर्यादी व त्याचे मित्र त्यांचे मोटार सायकलचा वेग वाढवुन झांबड चौकात आले असता यातील आरोपीने फिर्यादीच्या मोटार सायकला लाथ मारली व खाली पाडले व आरोपीने तुम्हाला जिवंत सोडणार नाही असे म्हणुन एकानी त्याच्या कंबरेचा चाकु काढुन फिर्यादीच्या कपाळावर मारला व त्याचा मित्र धम्मपाल यास पकडुन चाकुने छातीवर व दंडावर वार करुन जखमी केले दुसरा मित्र किशोर बनसोडे पळत असतांना त्यांच्या पाठीवर चाकुने वार केला असता त्यांची अंगावरील शर्ट फाटुन चाकुने पाठीवर खर्चटले त्यावेळी त्यांनी आरडा ओरडा केल्याने सदर आरोपी त्याची मोटार सायकल घेवुन पळुन गेले यातील आरोपीने फिर्यादी व त्यांचे मित्रास जिवे मारण्याच्या उद्देशाने चाकुने वार करुन जखमी केले आहे.म्हणुन गुन्हा. |

पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०५/११/२०१८ चे गुन्हे आढावा.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | पुंडलिक नगर | 301/18 कलम 364,34 भादवि | 03/07/15 ते 01/11/18 पावेतो न्याय नगर हुसेन कॉलनी औ.बाद | 04/11/18 वेळ 20.45 वा | नागेश जगन्नात गायकवाड वय 30 वर्षे धंदा मजुरी रा नगर हायवेवर तिसगाव शिवार गंगाधर नगर औ.बाद | 1)अमजद नदीम गौस 2)आसीफ समद खान 3)आमेर आसीफ खान 4)आरोपी महिला 5) आरोपी महिला | | | | पोउपनि/ सय्यद सिध्दीक | पोउप नि/ सय्यद सिध्दीक मो 9823567386 | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ची पत्नी हिस यातील आरोपीतांनी सगंनमत करुन भुरळ पाडुन जबरदस्तीने खुन करण्याच्या उद्देशाने पळवुन घेऊन जाऊन तिला कोठे तरी गायब केले वगैरे मजकुराच्या फिर्यादी वरुन गुन्हा दाखल |
| ३ | पुंडलिक नगर | 302/18 कलम 379 भादवि | 02/11/18 रोजी 22.00 ते दि 03/11/18 रोजी 12.00 वा पावेतो मारोती पातळे यांच्या घरा समोरुन | 04/11/18 वेळ 21.05 वा | कृष्णा संतराम राजबिंडे वय 36 वर्षे धंदा कोचींग क्लासेस रा भोग अपार्टमेंट फ्लॅट न 2 महेर नगर औ.बाद | अज्ञात | | 50.000/- रु कि एक मोपेड पाढ-या रंगाची जिचा क्र. MH-20-AV-1124 व 00.00 रु कि चे बिलबुक ,साई समर्थ टुर □न्ड ट्रव्हल्स नावाचे शॉप □क्ट लायसन्स शंकर सहकारी बॅंकेचे चेकबुक | | प्रोपो उप नि/ सोनवणे | सफौ/ शिंदे मो 7020508500 | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ची वरील वर्णनाची व किंमतीची मोपेड क्र MH-20-AV-1124 ही त्याचे मित्र मारोती पातळे यांच्या घरासमोर लावली होती ती कोणीतरी अज्ञात चोरट्याने लबाडीचे इराद्याने चोरुन नेली आहे म्हणुन गुन्हा दाखल |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०५/११/२०१८ चे गुन्हे आढावा.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | एम. सिडको | 331/18 कलम 379 भादवी | 03/11/18 रोजी 14.45 वा औरंगाबाद | 04/11/18 रोजी वेळ – 00.01 | मनोज बाजीराव गटकाळ वय – 48 वर्ष , धंदा-व्यवसाय रा- पाचोड ता- पैठण जि औबाद | अज्ञात | | 30 लाख रुपये | | | सपोनि /जाधव | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी ते चालवत असलेली गाडी क्र.MH20EE2121 ही मेडिसिएन कॉर्ट यार्ड हॉटेलच्या समोर गाडीमध्ये गाडीचे गिअरजवळ ठेवलेले 30 लाख रुपये असतांना पार्क करुन ऑफिसमध्ये गेलो असता गाडी मध्ये ठेवलेले 30 लाख रुपये कोणीतरी अज्ञात चोरट्याने गाडीची डाव्या बाजुची समोरची काच फोडुन स्वताचे फायद्यासाठी चोरुन नेले आहे.म्हणुन गुन्हा दाखल |
| ५ | एम. सिडको | 332 कलम 279, 337, 338, 304 (अ) भादवी | 03/11/18 रोजी 12:30 वाजेच्या सुमारास जाळगाव टी पाँइटच्या सिंग्रलच्या डाव्या बाजुस औरंगाबाद | 04/11/18 रोजी वेळ – 18.00 | समीर सुधाकर कुलकर्णी वय 34 वर्षे धंदा व्यवसाय काँट्रक्टर रा. कोहीनुर A 4 इमराल्ड सिटी गारखेडा परीसर औबाद | एस टि बस क्र. MH 20 BL 3917 चा चालक | | | | | आदेशाने सफौ चव्हाण | नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीच्या चुलत भावाची पत्नी मोहीणी ही तिची प्लेजर क्र. MH 20 CB 7165 वर बसुन सिडको बसस्टँन्ड येथुन कामगार येथुन जात असतांना जळगाव टि पाँइट येथुन जात असतांना बस क्र. MH 20 BL 3917 च्या चालकाने त्याच्या ताब्यातील एस टि बस ही भरधाव वेगाने निष्काळजी पणाने मोहीणी च्या प्लेजरला पाठीमागुन जोराची धडक देवुन मोहीणी हिस गंभीर जखमी करुन तिच्या मरणास एस टि बस चालक कारणीभुत झाला आहे. म्हणुन बाजुस प्रमाणे गुन्हा दाखल |
| ६ | एम. सिडको | 333/18 कलम 279 भादवी | 04/11/18 रोजी रात्री 09.30 वा. सुमारास हनुमान चौक चिकलठाणा औरंगाबाद | 04/11/18 रोजी वेळ – 23.05 | तुकाराम नारायण नवपुते वय- 30 वर्षे व्यवसाय – शेती रा- माळी गल्ली चिकलठाणा औबाद . | गाडी क्र - MH – 20 DJ 5499 महींद्रा XUV चा चालक प्रकाश गायके रा- दहीहंडे गल्ली चिकलठाणा औरंगाबाद | | | | | सफौ /एस. बी. केदारे | नमुदता वेळी व ठिकाणी यातिल फिर्यादीने त्याची MH – 20 EJ 7564 क्युड रेनॉल्ड कंपनीची गाडी हिला यातील आरोपी याने त्याच्या ताब्यात असलेंली गाडी क्र - MH – 20 DJ 5499 महींद्रा XUV हि भरधाव व निष्काळजीपणे हयगयीने चालवुन फिर्यादीच्या गाडीला डाव्या बाजुने समोरच्या दरवाज्याला रिव्हस घेतांना जोराची धडक देवुन दरवाज्या चेपुन साईड ग्लासचे नुकसान केले म्हणुन गुन्हा दाखल |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०५/११/२०१८ चे गुन्हे आढावा.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | जिन्सी | 320/18 कलम 353, 332, 333, 143, 147,148, भा.द.वी. | 02/11/18 रोजी मी 14.30 वा.सु. मदनी चौक बारी कॉलनी येथुन सेन्ट्रल औरंगाबाद | 04/11/18 रोजी. 01.09 | अरुण शेकुजी मोरे वय 55 वर्ष धंदा- नोकरी (मनपा) रा.गारखेडा नाथ प्रगांन शिवाजी नगर रोड औबाद | 5 ते 6 अनोळखी औरंगाबाद | | | | सफौ / हिव राळे | सपोनी / गीते | न.ता.वे.व.ठिकाणी यातील फिर्यादी हे सेन्ट्रल नाक्याकडे मो.सा.वर जात असताना मदनी चौक बारी कॉलनी मध्ये 5 ते 6 अनोळखी लोक हे मेन पाईप लाईन जवळ खड्डा खोदुन नळ कनेक्शन घेत असताना फिर्यादीने विचारले की तुमच्याकडे परमिशन आहे का.या कारणावरुन वरील 5ते 6 अनोळखी शिवागळ करुन हाताचापटाने माराहण करुन फिर्यादीच्या डाव्या पायावर फावडे मारुन फॅक्चर करुन जखमी केले म्हणुन गुन्हा दाखल |
| ८ | जिन्सी | 321/18 कलम 324, 323, 504, 506, 34. भादवी. | 04/11/18 रोजी 19.00 वा. सुमारास रेंगटीपुरा येथे समिर टेलर च्या दुकाना समोर औरंगाबाद. | 04/11/18 रोजी 23.20 वा. | सय्यद अजिम सय्यद शाहबुद्दीन वय- 26 वर्षे धंदा- मजुरी रा- अंगुरी बाग नाईकवाडा औबाद. | 1)शेख फारुक वय-20 वर्षे 2) शेख पप्पु वय- 24 वर्षे 3) शेख सुलतान वय- 21 वर्षे 4)आरोपी महिला औबाद | | | | पोह/ 133 खाजे कर | पोहेकाँ/ 1119 जेढर | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे ओळखीचे असुन यातील आरोपी क्र. 1 याने फिर्यादीची खिल्ली उडवल्याने व त्याचेवर फिर्यादी रागवल्याचे कारणावरुन यातील आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस शिवीगाळ करुन लाथाबुक्याने मारहाण केली व आरोपी क्र. 2 याने त्याचे खिशातील चाकु काढुन फिर्यादीच्या डाव्या हाताच्या पोटरीवर , छातीच्या डाव्या बाजुला चाकुने मारुन जखमी केले व फिर्यादीस जिवे मारुन टाकीन अशी धमकी दिली म्हणुन गुन्हा दाखल |
| ९ | वेदांत नगर | १८२/१८ कलम- ३८० भादवी | ०२/११/१८ वेळ-१५.०० ते १६.४५ वा.सु. बनेवाडी औरंगबाद | ०४/११/१८ वेळ- ०१.०५ वा. | किरण शिवसिंग कोटवाल वय- २२ वर्ष धंदा- शिक्षन रा. बनेवाडी रेल्वेस्टेशन रोड औबाद | आज्ञात | | ८९९९/-रु किं.एक Panasonic कंपणीचा मोबाईल जु.वा.किं.अं. | | | पो.ह/ २३९६ शेख हबीब मो.९८२ ३२५२३ ९६ | नमुद ता.वेळ व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्याचे घरात मोबाईल चार्जींग लावुन व घराचे दार उघडे ठेवुन झोपी गेले असता कोणीतरी अज्ञात आरोपीने उघड्या दाराच्या आतील घरात प्रवेश करुन वरिल वर्णनाचा मोबाईल चोरु नेला आहे सदर फिर्यादीने दोन दिवस शोध घेवुन दि.०४/११/१८ रोजी पो.ठाणे हजर येऊन म्हणुन गुन्हा दाखल |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०५/११/२०१८ चे गुन्हे आढावा.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | वेदांत नगर | १८३/१८<br>कलम-<br>३२४<br>५०४,३४<br>भादवी | ०३/११/१८<br>वेळ-२२.३० वा.सु.<br>पंचवटी चौक औरंगबाद | ०४/११/१८<br>वेळ-<br>०१.०५ वा. | जैद खान शम्शु खान वय-२८ वर्ष रा. जहागिरदार कॉलनी रेल्वेस्टेशन रोड औरंगाबाद | चार चाकी क्र. MH-२०-CS-८३८० चा चालक व शेजारी बसलेला अनोळखी इसम | | | | | पो.ह/<br>२२४७<br>जाधव<br>मो.८५<br>५४०५<br>३६०१ | नमुद ता.वेळ व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्याचे मो.सा.क्रMH-२०-DN-२८६० ही बसुन छावणी येथुन त्यांचे खा.काम करुन पंचवटी चौक मार्गे घरी येत असतांना पंचवटी कडुन चार चाकी वाहन क्र.MH-२०-CS-८३८० ह्या गाडी चालकाने व त्यच्या शेजारी बसलेल्या इसमाने फिर्यादीस शिवीगाळ करुन अंगावर धावुन येवुन फिर्यादीस मारले व कमरेच्या बेल्टाने लोखंडी हुक मारुन जखमी केले त्यामुळे फिर्यादीच्या डोक्यात जखम होवुन रक्त निघाले म्हणुन गुन्हा दाखल |
| ११ | क्रांती चौक | 428/18<br>कलम<br>363<br>भादवि | 03/11/18 रोजी सकाळी 06.55 वा. औरंगपुरा सिग्नल जवळ औरंगपुरा औरंगाबाद. | 04/11/18 रोजी 16.26वा. | संतोष माधवराव शेळके वय 42 वर्षे धंदा-नोकरी रा.सारा वैभव रो.हाऊस नं.E 15 जटवाडा रोड हर्सुल औरंगाबाद | अज्ञात | | | | | पोउप नि सोनटक्के साहेब | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा नमुद वर्णनाचा मुलगा हा शाळेत जाणेसाठी नमुद ठिकाणाहुन शाळेचे बसमध्ये गेला व शाळेचे जवळच उतरला असता तेथुन त्यास कोणीतरी अज्ञात ईसमाने पळवुन नेले आहे. त्याचा आम्ही नातेवाईक व औरंगाबाद शहर हद्दीत सर्वत्र शोध घेतला परंतु तो मिळुन आला नाही.म्हणुन आज रोजी पो.स्टेला तक्रार देत आहे माझ्या मुलाचा शोध व्हावा. वगैरे गुन्हा दाखल. |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०५/११/२०१८ चे गुन्हे आढावा.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | क्रांती चौक | 429/18 कलम 160, 504 भादवि | 04/11/18 रोजी 21.00वा. च्या सुमारास क्रांतीचौक पोलीस स्टेशनला शेजारी औरंगाबाद. | 04/11/18 रोजी 22.44 वा. | सतीश शिवाजीराव जाधव वय 36 वर्षे व्यवसाय नोकरी सहाय्यक पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन क्रांतीचौक औबाद शहर | 1)अनिकेत निखिल साळवे वय 20वर्षे, 2)रोहन सुरेश साळवे वय17वर्षे 3) दिपक प्रल्हाद साळवे वय23 वर्षे सर्व रा.संसारनगर औरंगाबाद | - | | | | पोह/ 1061 सैय्यद सलीम | नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील आरोपी पोलीस स्टेशन क्रांतीचौक समोर मारामारी करुन शिवीगाळ करत होते त्यांना फिर्यादीने समजावुन सांगतीले असता त्यांनी काही एक न ऐकता भांडण करुन एकमेकांना शिवीगाळ करुन धक्काबुक्की करुन मारामारी करुन सार्वजनिक शांतता बिघडविली म्हणुन माझी त्यांच्या विरुध्द भादवी कलम 160,504 अन्वये गुन्हा दाखल करुन मा.पोनिसो यांचे आदेशाने पुढील तपासकामी यांचे कडे दिले. |
| १३ | बेगम पुरा | 241/18 कलम 363 भा.दं.वि. | 03/11/18 रोजी 06.30 ते 04/11/18 रोजी 06.45, औरंगाबाद | 04/11/18 रोजी 15.13 | शेख अब्दुल मजीद शेख अब्दुल अजीज वय ३९ वर्ष धंदा रिक्षा ड्रायव्हर- रा.मोहम्मदीया मज्जीद जवळ,सईदा कॉलनी, औबाद | अज्ञात | | मुलाचे वर्णन - -शेख मुश्फीक वय-12 वर्ष | | | प्रो.पोउपनि श्री. देवकते मो.97 6544 4095 | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचा मुलगा नामे शेख मुश्फीक वय-१२ वर्ष हा मदरसा येथे जातो असे म्हणुन राहते घरातुन गेला व नंतर आलाच नाही त्याचे कोणीतरी अज्ञात कारणासाठी अपहरण केले आहे. वगैरे मजकुराच्या तक्रारीवरुन मा.पो.नि.सो. यांचे आदेशाने गुन्हा दाखल. |
| १४ | बेगम पुरा | 242/18 कलम 379 भा.दं.वि. | 31/11/18 रोजी 07.00 ते दि. 03/11/18 02.00 मोहम्मदीया मज्जीद जवळ,सईदा कॉलनी, औरंगाबाद | 04/11/18 रोजी 18.13 | तुमान अली खान साजेद अली खान वय 24 वर्ष धंदा शिक्षण-रा.फ्लॅट नं-9 ताहा हाईस थर्डफ्स, रोजाबाग, औरंगाबाद | अज्ञात | | 50,000 रु कि. ची बजाज पल्सर कंपनाची मो.सा क्र.mh 20 dk 5825 | | | पोह/ ४८१ निकम मो. 9922 4132 19 | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीने दोन महिन्यापासुन त्याचे ताब्यातील जुनी वापरती नमुद मो.सा बील्डीगंच्या पार्कींग मध्ये ठेवली असता अज्ञात आरोपीने फिर्यादीची मो सा.स्वत: च्या फायद्यासाठी लबाडीच्या इराद्याने चोरुन नेली आहे वगैरे मजकुराच्या तक्रारीवरुन मा.पो.नि.सो. यांचे आदेशाने गुन्हा दाखल |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०५/११/२०१८ चे गुन्हे आढावा.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | सिडको | 466/18 कलम 354(A), (1),(i), 323, 504, 506, भा.द.वि | 03/10/18 रोजी सायंकाळी 07.30वा. औरंगाबाद . | 04/11/18 रोजी 01.29 | फिर्यादी महिला वय 30 वर्ष रा. औरंगाबाद | मोनु नेवे रा. औरंगाबाद | | | | | पोह/ 205 हिवाळे | नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व आरोपी हे तोंडओळखीचे असुन यातील फिर्यादी ही औरंगाबाद येथुन दुध घेवुन तिचे घरी येत असतांना यातील आरोपी हा फिर्यादीचे घरासमोर फिर्यादी घरी येण्याआधीच उभा होता. सुमारे तीन ते चार दिवसापुर्वी मसाला आरोपीने ठेवलेला मसाला फिर्यादी का देत नाही या कारणावरुन यातील आरोपी याने फिर्यादी सोबत वाद घालून शिविगाळ केली व फिर्यादीचे मनास लज्जा वाटेल असे कृत्य करुन फिर्यादीस हातापटाने मारुन फिर्यादीचे तोंडावर व ओठावर मारुन आरोपी फिर्यादीस म्हणाली की, मी तुझ्या मुलीला किडण्याप करुन घेऊन जाईल व तुझ्या नवऱ्याला व तुला मारहान करील असे बोलुन मारहाण करण्याची व जिवे मारण्याची धमकी दिली. म्हणुन गुन्हा दाखल |
| १६ | सिडको | 467/18 कलम 452, 323, 504, 506 भादवी | 04/11/18 रोजी रात्री 02.30वा औरंगाबाद | 04/11/18 रोजी 13.30 | फिर्यादी महिला वय 65वर्ष, रा., औबाद . | सुरेंद्र हरीबहादुर थापा वय 40वर्ष रा ठाकरे नगर, औरंगाबाद | | | | | सफौ/ दांगोडे | नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व आरोपी हे नात्याने सासु जावाई असुन आरोपी व त्याच्या पत्निचे आपसात जमत नसल्याचे फिर्यादीने तिचे घरी त्यांना येण्यास मना केलेले असतांना यातील आरोपी हा फिर्यादीच्या घरात बळजबरीने घुसुन फिर्यादीच्या मुलास हाताचापटाने मारहाण करून शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली म्हणुन गुन्हा दाखल |
| १७ | सिडको | 468/18 कलम 379 भादवी. | 04/11/18 रोजी 09.30ते 10.30वा सुमारास मी जाधव मंडी नवीन मोंढा | 04/11/18 रोजी 15.38 | वैभव बबनराव थोरात वय 37 वर्ष धंदा शेती रा.प्लॉट नं. 25, प्रिय दर्शनी कॉलनी एन-5, रायगड बंगला,सिडको, औबाद. | अज्ञात | | | | | पोह/ 310 फुके | नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे भाजीपाला खरेदी करण्यांकरीता गेले असता त्याचे खिशातील वेगवेगळया वर्णनाचे मोबाईल हॅन्डसेट कोणीतरी अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेवुन काढुन घेवुन चोरुन नेले म्हणुन गुन्हा दाखल |

## पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०५/११/२०१८ चे गुन्हे आढावा.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | सिडको | 469/18 कलम 354, 354(A), 354(D), 341, 294(B), 504, 506, 34 भा.द.वि व सह कलम 12 लैगिंक अपराधा पासुन बालसंरक्षण कायदा 2012. | 04/11/18 रोजी 17.30वा. औरंगाबाद. | 04/11/18 रोजी 20.24 | आरोपी महिला रा. औरंगाबाद. | 1)अनोळखी तीन इसम नाव पत्ता माहीत नाही. | | | | | पोउप नि आबुज | यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांना ओळखत नसुन यातील फिर्यादी तिच्या गाडीवर चिरायु हॉस्पीटल येथे जॉब साठी जात असतांना यातील दोन अनोळखी आरोपी यांनी त्याचा मोसा क्र. MH20BZ5190 वर फिर्यादीचा पाठलाग करीत जाधववाडी भाजीमंडी व सनिसेंटर समोर रोडवर क्रमाक्रमाने फिर्यादीची गाडी अडवुन फिर्यादीस गाडी चालविणाऱ्या आरोपीने फिर्यादीस मी तुला लाईक करतो असे बोलला असता फिर्यादी ही आरोपीच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करुन पुढे जात असतांना आरोपींनी फिर्यादीची गाडी अडवुन गाडी चालविणाऱ्या आरोपीने फिर्यादीचा उजवा हात धरुन बळजबरीने जवळ ओढुन फिर्यादीचे मनास लज्जा वाटेल असे कृत्य करुन फिर्यादीस शिविगाळ करुन हातीचापटाने मारहाण करुन तोंडात मारून फिर्यादीस अश्लिल शिविगाळ केली. तसेच वरील दोन्ही आरोपीचा मित्र नाव पत्ता माहीत नाही. याने सनि सेंटर समोर रोडवर येवुन यातील फिर्यादी चा भाऊ यास शिविगाळ करुन मारहाण करुन कुऱ्हाडीने तुम्हा दोन्ही भाऊ बहिणीला मारुन टाकु अशी जिवे मारण्याची धमकी दिली. म्हणुन गुन्हा दाखल. |
| १९ | सिडको | 470/18 कलम 279, 338 भादवी | 03/11/18 रोजी 07.00 वा सिडको बसस्थानक कडुन हर्सुल रोडकडे जाणा-या रोड, एन-7, पेट्रोलपंप समोर, औरंगाबाद | 04/11/18 रोजी 23.52 | बंडु भिमराव फडे वय 40 वर्षे धंदा - खा.नौ रा. MIDC प्लॉट नं. W-75 चिकलठाणा औरंगाबाद मुळ रा. तुपेवाडी ता.पैठण जि. औबाद | पिवळया रंगाची बस नं. MH-20EE-2833 | | | | | पोह/ 724 गायधने | नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे ते चालवित असलेले मो.सा. नंबर MH-20BA-757 हर्सुल रोड ते बसस्थानक रोड प्रवास करीत असतांना सिडको बसस्थानक ते हर्सुल रोडने जाणा-या बस क्रमांक MH-20EE-2833 च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात चालवुन निष्काळजीपणा केला फिर्यादीस व मुलीस धडक देवुन गंभीर जखमी केले म्हणुन गुन्हा दाखल |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०५/११/२०१८ चे गुन्हे आढावा.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | सिटि चौक | 334/18 कलम 307, 34 भा द वि | 3/11/18 रोजी 21.30 ते 22.00 वा दरम्यान सिटीचौक पावर हाऊसच्या मागे औरंगाबाद | 4/11/18 रोजी 04.53 वा | मुसा खान पिता शमशेर खान उर्फे नबाब वय 42 वर्ष धंदा – भट्यारी (आचारी ) रा सिटीचौक पावर हाऊसच्या मागे औरंगाबाद | फारेज फैसल चाऊस रा शहांगज पाण्याच्या टाकीजवळ बुक्कलगुंडा मटन मार्कटजवळ औरंगाबाद व दोन तीन मुले | | | | | पो उपनि ए डी नागरे मो क्र 9405 9453 54 | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी नामे फारेस चाऊस व इतर दोन तीन मुलांनी फिर्यादीचा मुलगा यास दि 3/11/18रोजी रात्री 09.30ते 10.00वा वाजेच्या दरम्यान फिर्यादीचे घरासमोर मोबाईल टाँर्च चमकावलेच्या कारणावरुन फिर्यादीचे मुलास फारेज चाऊस, व इतर मुलांनी डोक्यात लाकडी सेट्रींगच्या बल्लीच्या दांड्याने मारुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.त्यास डोक्यास व बरगडीस मार लागुन गंभीर जखमी केले. म्हणुन गुन्हा दाखल. |
| २१ | सिटि चौक | 336/18 कलम 294 भादवी सह कलम 67 आयटी अँक्ट 2000 | 30/09/18 चे 19.00 ते दि. 04/11/18 चे 18.30 वा.पावेतो फिर्यादीचे मोबाईलवर राहते घरी | 04/11/18 रोजी 19.42 वाजता दाखल | विखार खान पिता मुक्तार खान वय 38 वर्ष धंदा लँब्रोटरी, रा.शाहबाजार, कलर्स हाँस्पीटल जवळ, औरबाद | मोबाईल क्रमांक चा अनोळखी मोबाईल धारक | --- | --- | | | मा.पो. नि. सिनगारे मो.न. 9823 6979 99 | नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचा मोबाईल क्रमांक यावर एक अनोळखी मोबाईल धारक याने मोबाईल क्रमांक या आरोपीने अश्लील मँसेज पाठवून फिर्यादीच्या दाजीला फिर्यादीच्या बहीणीचे अश्लील फोटो पाठवतो व तुझ्या बहीणीला फारकत देण्यास सांगतो अशी धमकीचे मँसेज मोबाईलवर पाठविले म्हणून वरील प्रमाणे गुन्हा दाखल करुन पुढील तपास मा.पो.नि.सो सिनगारे हे करत आहे. |
| २२ | हर्सुल | २२९/१८ कलम- ३२४, ३२३, ५०४,३४ भादंवि. | ०४/११/१८ रोजी १८.०० छत्रपती नगर मंगेश किराणा दुकानासमोर जाधववाडी औरंगाबाद. | ०४/११/१८ रोजी २२.५१ वा. | पंडीत बाबूराव पवार वय-२९ वर्ष व्यवसाय-भाजीपाला हातगाडी रा.संयोग नगर जाधववाडी चिकुच्या बागे जवळ औबाद. | अक्षय रोकडे लल्ल्या शिंदे पुर्ण नाव माही त नाही दोन्ही रा. सदर. | | | | | पोह./ २३११ तायडे. | न ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे नेहमी प्रमाणे त्यांचे घरुन जाधववाडी येथे भाजीपाल्याच्या गाड्या आल्या का हे पाहण्यासाठी व खाली करणेसाठी पायी जात असतांना नमुद आरोपी हे त्यांचेजवळ आले व काही एक कारण नसतांना फिर्यादी कडे पाहुन शिवीगाळ करु लागले मला शिवीगाळ का करता असे म्हणताच यातील आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस हाताचापटाने मारहान करुन आरोपी क्र.१ याने फिर्यादीस डोक्यात दगड मारुन डोके फोडले म्हणुन गुन्हा दाखल. |

## पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०५/११/२०१८ चे गुन्हे आढावा.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३ | वाळुज | २३१/१८ कलम २७९, ३३७, ३३८, ३०४,(अ) भादवि | ०४/११/१८ वेळ ०७.००वा ठिकाण त्रिमुर्ती ट्रक गॅरेज वाळुज ता.गंगापुर | ०४/११/१८ वेळ ११.३७ वा | विजय ज्ञानेश्वर आहेर वय ४५वर्ष धंदा वेल्डींग दुकान रा.लाईन नगर वाळुज ता,गंगापुर | वोक्स वँगन गाडी क्र एम.एच.१४.डी टी.५५०७ चा चालक रा चाकण पुणे | | | | | पोउपनि/बागुल | न ता.वेळ व ठिकाण यात फिर्यादी हे वेल्डींग दुकान चालवतात व ते व त्यांचे मेव्हणे हरिश संजय वाघ नेहमी प्रमाणे टाटा ११०९ क्र एम.एच २० डीई. ०३३७ ही औरंगाबाद ते नगर हायवे ला उभी केली व चहा प्यायला गेले असता वोक्स वँगन गाडी क्र एम.एच.१४.डीटी.५५०७ चा चालक रा चाकण पुणे हा भरधाव वेगाणे गाडीचा तोल सुटुन त्याने फिर्यादीच्या मव्हण्याच्या आंगावर घालुन त्या गंभीर जखमी करुन त्यांचे मरणास कारणीभुत होऊन बाजुला उभे असलेले टाटा ११०९ क्र एम.एच२० डीई. ०३३७ या वाहणाला जाउन धडकले म्हणुन गुन्हा नोंद |
| २४ | वाळुज | २३२/१८ कलम ३७९,३४ भादवि व २१(४) खान एवं खनिज अधि. १९५७ | ०४/११/१८ वेळ --- ठिकाण वाळुज ता.गंगापुर | ०४/११/१८ वेळ २३.३४ वा | अरुन दामोधर ज-हाड वय४२वर्ष धंदा नोकरी | १)आरोपी महिला २)मुरलीधर केदारे ३)अनिस रसुल शेख रा.सदर | | ३,००,०००/-रु | | | स.फौ/ एन.के. बुट्टे | न ता.वेळ व ठिकाण यात फिर्यादी तहसिलदार असुन त्याच्या कर्मच्या-या समनेत ता.गंगापुर येथे गट नं २१० येथे आरोपी क्र १ कोणतीही परवानगी न घेता १०० ब्रास वाळु अनाधिकृत उत्खनन झाल्याचे दिसुन आले व अंदाजे ३,००,०००/-रु कि.माल घेउन गेले व जेसाबा मालक आरोपी क्र२ रा.वाळुज व आरोपी क्र३ यांनी वाळु चोरुन नेली म्हणुन गुन्हा नोंद |
| २५ | सातारा | 452/18 कलम 452, 354, 506 भा.द.वि. | 01/11/18 रोजी 13.30 वाजता फिर्यादीच्या घरी. | ४/११/१८ रोजी २२.२६ वाजता. | फिर्यादी महिला वय 22 वर्ष धंदा घरकाम रा. औरंगाबाद | शुभम प्रकाश भिवसने वय 24 वर्ष रा. कैलासनगर , औरंगाबाद | | | | | पोह/ 1991 चव्हाण 9689749872 | नमुद तारीख वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी हे त्याच्या घरी असताना यातील आरोपी याने फिर्यादीच्या घरात अनाधिकृतपणे प्रवेश करुन आरोपीने फिर्यादीचा वाईट उद्देशाने हात धरुन फिर्यादीला त्याच्याकडे ओढुन फिर्यादीच्या मनाला लाज वाटेल असे वर्तन केले . फिर्यादीने आरोपीस माझ्या नव-याला सांगते असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीला म्हटले की तु जर नव-याला सांगीतले तर मी तुला मारुन टाकीन व तुझ्या नव-यालाही सोडणार नाही असे म्हणुन धमकी दिली म्हणुन गुन्हा दाखल. |

पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि ०५/११/२०१८ चे गुन्हे आढावा.

**पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दिनांक ०४/११/२०१८ चे ००-०० ते २४-०० वाजेपावेतो अकस्मात मृत्यु दाखल गुन्हे आढावा.**

| अ क्र | पोलीस ठाणे | अ. मृ. क्र. | आ मृ घ ता वेळ ठिकाण | दाखल ता वेळ | खबर देणार | मयताचे नाव | मरणाचे कारण | तपास | खुलासा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | छावणी | १८१/१८ कलम १७४ भादवि. | दि.४/११/२०१८ रोजी ११.४५ वा घाटीदवाखन्ाा औ.बाद. | दि.०४/११/२०१८ रोजी १४.०० | पोना /९१० एम डी सोनवणे ने.घाटी मेडीकल चोकी.औ.बाद | सविञाबाई विठ्ठल साळ्वे वय ७० वर्ष रा. लक्ष्मी कॉंलनी गट नं. १ छावणी औ.बाद | पाय घसरुन पडल्याने डोक्याला मार लागल्याने | मपोना २१९० गायकवाड | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील खबर देणार पोना /९१० एम डी सोनवणे ने.घाटी मेडीकल चोकी.औ.बाद.यांनी लेखी रिपोर्ट दिला की, धाटी दवाखाना MLC NO- २१९/९६/apj/१८ दि. ०४/११/२०१८ वेळ ११.३५ वाजेमधील बेशुध्द बाई नामे सविञाबाई विठ्ठल साळ्वे वय ७० वर्ष रा. लक्ष्मी कॉंलनी गट नं. १ छावणी औ.बाद हीस रमेश गोविंदराव थोरात ,अभिषेक अशोक सुरडकर मो. नं. ९२२५८२७७७८ यांनी घाटी गवाखाना अपघात विभागात आणुन दाखल केले व मा. CMO सो यांना समक्ष कळ्विले की. दि. ४/११/१८ रोजी वे. ११.२५ वा.सु.फर्शिवरुन चालत असताना पाय घसरुन पडल्याने डोक्याला मार लागल्याने तीस उपचारकामी घाटी दवाखना ्अपघात विभागात दाखल केले cmo सो यांनी साविढञीबाई हीस तपासुन दि.४/११/२०१८ रोजी ११.२५ वा.मयत घोषित केले वगेरे मजकुराचे रिपोर्टावरुन अ.मृ.दाखल क |
| २ | मुकुंद वाडी | ६३/१८ कलम १७४ भादवि. | 04/11/18 रोजी 10.35 वा. | 04/11/18 रोजी 14.07 वा. | पोना. एम.डी. सोनवने ब. न. 910 घाटी पोलीस चौकी औरंगाबाद | अबाजी सदाशिव मगरे वय 69 वर्ष. रा. मुकुंदनगर, मुकुंदवाडी, औरंगाबाद | अचानक चक्कर येवुन पडल्याने | एचसी १२५४ मनगटे | नमूद ता वेळी व ठिकाणी यातील खबर देणार घाटी पोलीस चौकी पोना. एम.डी. सोनवने ब. न. 910 यांनी लेखी एम.एल.सी क्रं. 11423/MSQ/18 दि. 04/11/2018 मधील बेशुद्द इसम नामे अबाजी सदाशिव मगरे वय 69 वर्ष. यांना संजय इंगळे यांनी त्यांना दि. 03/11/2018 रोजी 10.00 वा.सु. राहत्याघरी मुकुंदनगर औरंगाबाद येथे अचानक चक्कर येवुन पडल्याने नाकास मार लागल्याने त्यांना आज दि. 04/11/2018 रोजी घाटी दवाखाना अपघात विभागात दाखल केले होते आज दि. 04/11/2018 रोजी मा.CMO सो यांनी तपासुन 10.35 वा. मयत घोषीत केले. |

**SD/-**

**(डॉ.नागनाथ कोडे)**

पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर

करीता.